# इंदुताई पाटणकर यांचे सामाजिक आणि स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

**पूजा सर्जेराव चौगले,** संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

ईमेल- poojachougale5@gmail.com

---


## 1. सारांश

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील ख्यातनाम स्वातंत्र्यसेनानी आणि थोर सामाजिक कार्यकर्त्या इंदुताई पाटणकर (१९२५-२०१७) यांचे जीवन बहुआयामी जीवनकार्यासाठी समर्पित केले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनानंतर सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारने (पत्री सरकार) ब्रिटीश सत्तेला समांतर शासन व्यवस्था उभी करून आव्हान दिले होते. या सशस्त्र आणि भूमिगत चळवळीत इंदुताईंनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी दिलेले योगदान अद्वितीय आहे. प्रामुख्याने इंदुताईंनी राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून केलेले संघटन, भूमिगत कार्यकर्त्यांना दिलेली मदत आणि ब्रिटीश पोलिसांचा ससेमिरा चुकवत चालवलेले कार्य यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवणे हेच त्यांचे ध्येय नव्हते, तर स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांनी कष्टकरी, शेतकरी, धरणग्रस्त आणि विशेषतः परित्यक्ता व शोषित महिलांच्या हक्कांसाठी 'स्त्री मुक्ती संघर्ष चळवळी'च्या माध्यमातून प्रदीर्घ लढा दिला. इंदुताई पाटणकर यांचे कार्य हे केवळ एका जिल्ह्यापुरते मर्यादित नसून ते महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासातील एक प्रेरणादायी पर्व आहे. स्त्री-पुरुष समानता आणि शोषणाभिमुख समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी त्यांनी दिलेला लढा आजही तितकाच प्रस्तुत ठरतो.


## 2. प्रस्तावना (Introduction)

भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याचा संघर्ष नव्हता, तर तो सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्यांच्या स्थापनेसाठीचा व्यापक जनआंदोलन होता. या लढ्यात अनेक पुरुष नेत्यांबरोबरच स्त्रियांनीही महत्त्वपूर्ण आणि धाडसी भूमिका बजावली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे, विशेषतः सातारा जिल्ह्याचे योगदान ऐतिहासिक आहे. १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनानंतर सातारा जिल्ह्यात 'प्रतिसरकार'ची स्थापना झाली. या काळात अनेक वीर महिलांनी घरादारावर तुळशीपत्र ठेवून आंदोलनात उडी घेतली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून उभ्या राहिलेल्या इंदुताई पाटणकर या अशाच एका क्रांतिवीरांगना होत्या. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला तसेच स्वातंत्र्यानंतरही समाजपरिवर्तनाच्या चळवळींमध्ये प्रभावी योगदान दिले.. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांनी राष्ट्र सेवादलाच्या माध्यमातून कार्यास सुरुवात केली आणि अखेरच्या श्वासापर्यंत त्या शोषितांच्या न्यायासाठी लढत राहिल्या.

**3. कीवर्ड (Keywords) :** क्रांतिवीरांगना, इंदुताई पाटणकर, प्रतिसरकार, सातारा, स्वातंत्र्य चळवळ, मुक्ती संघर्ष, सामाजिक परिवर्तन, परित्यक्ता.

## 4. उद्दिष्टे (Objectives)

1. इंदुताई पाटणकर यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील भूमिकेचा अभ्यास करणे.
2. इंदुताई पाटणकर यांनी स्वातंत्र्योत्तर काळात केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

## 5. गृहितक (Hypothesis)

1. इंदुताई पाटणकर यांचे कार्य केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरते मर्यादित नसून ते सामाजिक समतेसाठीही होते.

## 6. विषय विवेचन

### 6.1 इंदुताई पाटणकर यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात १९४२ चे 'छोडो भारत' आंदोलन हे निर्णायक ठरले. या आंदोलनाचे पडसाद सातारा जिल्ह्यात उमटले आणि तिथे 'प्रतिसरकार' (पत्री सरकार) ही समांतर शासन व्यवस्था उभी राहिली. या क्रांतीपर्वात इंदुताईंनी दिलेले योगदान खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

- **राष्ट्र सेवा दलाचा पाया:** इंदुताईंचे माहेरचे नाव इंदुमती निकम. इंदोली, तालुका- कराड, जिल्हा- सातारा हे त्यांचे गाव. लहानपणापासूनच त्यांच्यावर राष्ट्र सेवा दलाचे संस्कार होते. साने गुरुजींच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी वयाच्या १६-१७ व्या वर्षीच देशसेवेचे व्रत घेतले. सेवा दलाच्या माध्यमातून त्यांनी खेडोपाड्यात जाऊन महिलांचे संघटन करण्यास सुरुवात केली. इंदुताई पाटणकर यांच्या क्रांतिकारी जीवनाची खऱ्या अर्थाने

सुरुवात 'राष्ट्र सेवा दल' या संघटनेतून झाली. सेवा दलाने त्यांच्यावर जे संस्कार केले, तेच त्यांच्या पुढील ७० वर्षांच्या सामाजिक संघर्षाचा आधार ठरले.

- ❖ शिस्त आणि धाडस: राष्ट्र सेवा दलात मुला-मुलींना शारीरिक कसरती, लाठी-काठी चालवणे आणि सांघिक शिस्तीचे धडे दिले जात. इंदुताईंनी हे प्रशिक्षण अत्यंत आत्मियतेने पूर्ण केले. सेवादलाचे 'कला पथक': सेवादलाच्या कला पथकाद्वारे क्रांतीची गाणी आणि पोवाडे गाऊन लोकांमध्ये जागृती केली जात असे. इंदुताईंनी या पथकामध्ये सक्रिय सहभाग घेऊन खेडोपाड्यातील लोकांपर्यंत स्वातंत्र्याचा विचार पोहोचवला. त्यांच्या आवाजातील आब आणि शब्दांतील धार लोकांसाठी प्रेरणादायी ठरत असे.
- ❖ जातीभेद विरोधी दृष्टीकोन: राष्ट्र सेवा दल हे जात-पात मानत नसे. 'आंतरजातीय विवाह' आणि 'सहभोजन' यांसारख्या उपक्रमांमुळे इंदुताईंच्या मनातील जातीभेदाच्या भिंती गळून पडल्या. याच संस्कारांमुळे त्यांनी पुढे आयुष्यभर कष्टकरी आणि दलितांच्या हक्कांसाठी लढा दिला.
- ❖ स्त्री-शक्तीचे जागरण: त्याकाळी स्त्रियांनी सार्वजनिक कार्यात येणे ही मोठी गोष्ट होती. मात्र, सेवादलाने इंदुताईंना नेतृत्व करण्याची संधी दिली. त्यांनी सेवा दलाच्या माध्यमातून अनेक तरुणींना संघटित केले आणि त्यांना स्वातंत्र्याच्या मुख्य प्रवाहात आणले.
- ❖ राष्ट्र सेवा दलामुळेच इंदुताईंना 'लोकशाही समाजवाद' (Democratic Socialism) समजला, जो त्यांच्या पुढील 'मुक्ती संघर्ष' चळवळीचा गाभा बनला.

- **प्रतिसरकारमधील सक्रिय सहभाग:** १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनानंतर सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश सत्तेला समांतर असे 'प्रतिसरकार' स्थापन झाले. या सरकारमध्ये इंदुताई पाटणकर यांनी दिलेले योगदान हे केवळ साहसी नव्हते, तर ते एका ध्येयवेड्या क्रांतिकारकाचे होते.

  - ❖ भूमिगत कार्यकर्त्यांची 'रसद' व्यवस्था: प्रतिसरकारचे अनेक नेते (उदा. क्रांतिसिंह नाना पाटील, बाबूजी पाटणकर) भूमिगत होते. त्यांच्यावर इंग्रज पोलिसांनी बक्षिसे लावली होती. अशा वेळी या कार्यकर्त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षितपणे हलवणे, त्यांना भोजन पुरवणे आणि त्यांची शस्त्रे सुरक्षित ठिकाणी लपवून ठेवणे, ही अत्यंत जोखमीची कामे इंदुताईंनी यशस्वीपणे पार पाडली.
  - ❖ गुप्त वार्ताहर (Messenger) म्हणून भूमिका: ब्रिटीश पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी प्रतिसरकारचे कार्यकर्ते सांकेतिक भाषेत निरोप पाठवत असत. इंदुताईंनी साध्या ग्रामीण महिलेचा वेश धारण करून, कधी डोक्यावर गवताचा भारा घेऊन, तर कधी शेतमजूर म्हणून पोलिसांच्या नाकाखालून महत्त्वाचे निरोप आणि पत्रे पोहोचवली. त्यांच्या या चातुर्यामुळे अनेकदा मोठे अनर्थ टळले.
  - ❖ शस्त्रास्त्रांची ने-आण:प्रतिसरकारच्या सशस्त्र लढ्यासाठी शस्त्रांची गरज भासत असे. इंदुताईंनी अत्यंत निर्भीडपणे रिव्हॉल्व्हर आणि इतर स्फोटके आपल्या साडीत किंवा सामानात लपवून एका केंद्रावरून दुसऱ्या केंद्रावर पोहोचवली. पोलिसांना एका तरुण मुलीवर संशय येईल असे कधीच वाटले नाही, ज्याचा फायदा चळवळीला झाला.
  - ❖ प्रबोधन आणि संघटन: त्या केवळ पडद्यामागून काम करत नव्हत्या, तर गावोगावी जाऊन महिलांच्या सभा घेत असत. "स्वराज्य म्हणजे काय?" आणि "ब्रिटीशांना का घालवायचे?" हे त्या सोप्या भाषेत पटवून देत. त्यांच्या प्रभावामुळे अनेक ग्रामीण महिलांनी आपल्या घरातील पुरुषांना क्रांतीकार्यात पाठवले आणि स्वतःही मदत केली
  - ❖ बाबूजी पाटणकरांची साथ आणि संघर्ष:प्रतिसरकारचे खंदे शिलेदार बाबूजी पाटणकर यांच्याशी कामाच्या ओघात त्यांची ओळख झाली. या दोघांनी मिळून सातारा-सांगली सीमाभागात ब्रिटीश प्रशासनाला जेरीस आणले होते. अनेकदा जंगलात किंवा डोंगराळ भागात उपाशीपोटी राहून त्यांनी स्वातंत्र्याची मशाल जळती ठेवली.

- ❖ न्यायदान प्रक्रियेत सहभाग:प्रतिसरकारने स्वतःची 'लोक न्यायालये' स्थापन केली होती. ग्रामीण भागातील भांडणे सोडवणे आणि गरिबांना न्याय देणे यात इंदुताईंचा शब्द महत्त्वाचा मानला जाई. त्यांनी सावकारी पाश आणि स्त्रियांवरील अत्याचारांविरुद्ध या न्यायालयातून कडक भूमिका घेतली. इंदुताईंनी प्रतिसरकारमध्ये केलेले कार्य हे हे सिद्ध करते की, स्वातंत्र्यलढा केवळ शहरांतून किंवा नेत्यांच्या भाषणांतून लढला गेला नाही, तर तो सातारा-सांगलीच्या मातीत इंदुताईंसारख्या वीरांगणांनी प्रत्यक्ष रणांगणावर उतरून लढला होता.

- **भूमिगत चळवळीचे केंद्र:** सातारा आणि सांगली जिल्ह्याच्या सीमाभागात त्यांनी क्रांतीचे केंद्र बनवले होते. इंग्रज पोलीस कार्यकर्त्यांच्या पाठीवर असायचे, अशा वेळी वेशांतर करून किंवा रात्रीच्या वेळी मैलोन्मैल पायी चालून त्यांनी चळवळ जिवंत ठेवली. अनेकदा अटकेची शक्यता असतानाही त्यांनी आपल्या बुद्धीचा वापर करून पोलिसांना हुलकावणी दिली.
- **क्रांतिवीर बाबूजी पाटणकर यांची साथ:** स्वातंत्र्य चळवळीतच त्यांची भेट 'बाबूजी पाटणकर' यांच्याशी झाली. या दोघांनीही एकत्र येऊन प्रतिसरकारमध्ये मोठे काम केले. १९४६ मध्ये या क्रांतिकारी जोडप्याने लग्नाची बेडी घातली, पण त्यांचे पहिले प्राधान्य देशहितच होते. लग्नानंतरही त्यांनी कासेगाव हे केंद्र बनवून स्वातंत्र्य मिळेपर्यंत लढा सुरूच ठेवला.
- **स्त्रियांचे लष्करी संघटन:** त्याकाळी स्त्रियांनी घराबाहेर पडणे कठीण होते, मात्र इंदुताईंनी महिलांना लाठी-काठी चालवणे, स्वसंरक्षण करणे आणि चळवळीत सामील होण्याचे प्रशिक्षण दिले. यामुळे प्रतिसरकारला एक मोठी 'महिला शक्ती' लाभली.

एकंदरीत इंदुताईंचे योगदान हे केवळ एक 'सहभागी' म्हणून नव्हते, तर त्या प्रतिसरकारच्या एक 'आधारस्तंभ' होत्या. त्यांनी केवळ पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला नाही, तर महिलांनाही या लढ्यात मुख्य प्रवाहात आणले.

**6.2 स्वातंत्र्योत्तर सामाजिक कार्य**

इंदुताई पाटणकर यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य जितके दैदीप्यदीमान होते, तितकाच त्यांचा स्वातंत्र्योत्तर काळ हा कष्टकरी आणि शोषित महिलांच्या न्यायासाठी समर्पित होता. त्यांनी 'स्वातंत्र्य म्हणजे केवळ सत्तांतर नव्हे, तर सामाजिक समता' हे मानून आपले कार्य पुढे नेले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इंदुताई शांत बसल्या नाहीत. त्यांनी 'स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ' आणि 'शेतकरी कामगार पक्ष' यांच्या माध्यमातून काम सुरू ठेवले: इंदुताईंनी स्वतःला सत्तेच्या राजकारणापासून दूर ठेवले आणि समाजातील वंचित घटकांसाठी 'मुक्ती संघर्षा'ची नवी मशाल पेटवली.

- **परित्यक्ता महिलांची चळवळ:** इंदुताईंचे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक कार्य म्हणजे 'परित्यक्ता' (पतीकडून सोडल्या गेलेल्या) स्त्रियांना न्याय मिळवून देणे. त्याकाळी ग्रामीण भागात हजारो स्त्रियांना त्यांच्या पतींनी कोणत्याही कारणाशिवाय सोडून दिले होते. या स्त्रियांना समाजात आणि माहेरीही स्थान नव्हते. इंदुताईंनी 'स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ' अंतर्गत या महिलांना एकत्र केले. १९८० च्या दशकात त्यांनी 'परित्यक्ता महिला परिषद' भरवून सरकारला या महिलांच्या रेशन कार्डावर आणि जमिनीच्या उताऱ्यावर नावासाठी कायदा करण्यास भाग पाडले.
- **धरणग्रस्त आणि दुष्काळग्रस्तांचा लढा:** पश्चिम महाराष्ट्रातील, विशेषतः सांगली आणि सातारा जिल्ह्यातील धरणग्रस्तांच्या प्रश्नावर त्यांनी मोठे काम केले. कोयना आणि वारणा धरणग्रस्तांचे पुनर्वसन: धरण बांधले गेले पण ज्यांच्या जमिनी गेल्या, त्यांना न्याय मिळाला नव्हता. इंदुताईंनी 'श्रमिक मुक्ती दला'च्या माध्यमातून या शेतकऱ्यांचे नेतृत्व केले. 'समान पाणी वाटप' आणि 'दुष्काळ निवारण' यांसाठी त्यांनी सरकारविरुद्ध अनेक आंदोलने केली.
- **स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ**: स्त्रियांना केवळ चूल आणि मूल यापुरते मर्यादित न ठेवता, त्यांना राजकीय आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत आणण्यासाठी त्यांनी काम केले. त्यांनी महिलांना 'शेतकरी कामगार पक्ष' आणि इतर डाव्या चळवळींशी जोडले. हुंडाबळी, घरगुती हिंसाचार आणि अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी गावोगावी प्रबोधन केले.

- **कासेगाव शिक्षण संस्था आणि समाज प्रबोधन:** आपल्या पतीच्या (बाबूजी पाटणकर) निधनानंतर त्यांनी कासेगाव येथे शिक्षणाचे कार्य पुढे नेले. समाजातील शेवटच्या मुलापर्यंत शिक्षण पोहोचावे, यासाठी त्यांनी 'आझाद विद्यालया'च्या माध्यमातून काम केले.
- **अंधश्रद्धा निर्मूलन आणि जातीभेद विरोधी कार्य:** इंदुताईंनी आयुष्यभर जातपंचायतींच्या जाचाविरुद्ध आणि कर्मकांडांविरुद्ध लढा दिला. त्यांनी नेहमीच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार केला आणि समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले.

**7. निष्कर्ष (Conclusion)**

1) **सामाजिक न्यायची जोड :** क्रांतिवीरांगना इंदुताई पाटणकर या केवळ एक स्वातंत्र्यसेनानी नव्हत्या, तर त्या एक विचारवंत आणि कृतिशील कार्यकर्त्या होत्या. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याला सामाजिक न्यायाची जोड दिली. आजच्या पिढीसाठी त्यांचे निर्भीड नेतृत्व आणि त्याग हा एक मोठा आदर्श आहे.
2) **अधिकार :** इंदुताईंचे स्वातंत्र्योत्तर कार्य हे "माणूस म्हणून जगण्याचा अधिकार" मिळवून देण्यासाठी होते. त्यांनी केवळ भाषणे दिली नाहीत, तर स्वतः रस्त्यावर उतरून मोर्चे, धरणे आणि आंदोलने केली. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना 'क्रांतीवीरांगणा' ही पदवी सार्थ ठरते.
3) **अखंड संघर्ष:** इंदुताईंचे कार्य केवळ १५ ऑगस्ट १९४७ ला थांबले नाही, तर खऱ्या अर्थाने तिथून त्यांच्या सामाजिक क्रांतीची सुरुवात झाली. त्यांनी 'राजकीय स्वातंत्र्य' आणि 'सामाजिक मुक्ती' या दोन्ही गोष्टींची सांगड घातली.
4) **स्त्रीमुक्तीचा वास्तववादी विचार:** केवळ कागदावर किंवा भाषणात स्त्रीमुक्ती न मांडता, त्यांनी ग्रामीण भागातील 'परित्यक्ता' आणि 'शोषित' महिलांच्या पोटापाण्याच्या आणि हक्काच्या प्रश्नांना वाचा फोडली.
5) **लोकशाहीचा पाया:** प्रतिसरकारच्या माध्यमातून त्यांनी लोकशाही आणि स्वशासनाचा जो धडा गिरवला, तोच त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात धरणग्रस्त आणि कष्टकऱ्यांच्या आंदोलनात वापरला.
6) **वारसा:** इंदुताईंनी दिलेला लढा आजही महाराष्ट्रातील अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा देत आहे. त्यांनी निर्माण केलेली 'स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ' ही आजही स्त्रियांच्या हक्कासाठी कार्यरत आहे. इंदुताई पाटणकर या केवळ एका चळवळीच्या नेत्या नव्हत्या, तर त्या समताधिष्ठित समाज घडवणाऱ्या एक 'युगप्रवर्तक' होत्या.

**8. संदर्भ (References)**

1) पाटणकर भारत,(२०२५), “क्रांतिवीरांगना इंदुताई पाटणकर”, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
2) ओम्वेट गेल, (१९८०), “वी विल स्मॅश धिस प्रिझन: इंडियन विमेन इन स्ट्रगल”, झेड प्रेस, लंडन.
3) चोरमारे विजय, (२०२१), “कर्तुत्ववान मराठा स्त्रिया”, विजिगीषा प्रकाशन, कोल्हापूर.
4) गुरव बाबुराव, (२००१), “क्रांतिवीर इंदुताई पाटणकर”, निर्मिती विचारमंच कोल्हापूर.
5) ओम्वेट गेल, गाला चेतना, केळकर गोविंद, (१९८८), “विमेन अँड स्ट्रगल”, काली फॉर विमेन, नवी दिल्ली.
6) साप्ताहिक साधना https://www.weeklysadhana.in/index.php/view_article/baburao-gurav-onindutai-patankar
7) TimesofIndia15July2017https://www.google.com/amp/s/timesofindia.indiatimes.com/city/mumbai/freedom-fighterindumati-patankar-passesaway/amp_ articleshow/59605711.cms
8) https://www.google.com/amp/s/sarkarnama.esakal.com/amp/story/vishleshan/indutai-patankar-13673